**न्यायदंडाधिकारी वर्ग–०१ देवरुख यांचे न्यायालयात, मुक्काम देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.**

**नि.फौ.खटला क्र.६३/२०२४**

**नि. क्र. ४२**

**दोषारोपपत्र**

**मी, श्रीमती आर. आर. कुलकर्णी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख, याद्वारे तुमच्यावर आरोप निश्चित करीत आहे की,**

**आरोपी क्र.१ चे नांव** – संदिप तुकाराम पवार,
**वय** – ३४ वर्षे, **व्यवसाय** – शेती,
**पत्ता**– हातीव, (गोठणे पुनर्वसन) ता. संगमेश्वर

**आरोपी क्र.२ चे नांव** – मंगेश जनार्दन कामतेकर,
**वय** – ३६ वर्षे, **व्यवसाय** – सुतारकाम,
**पत्ता**– मारळ, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

**आरोपी क्र.३ चे नांव** – अक्षय सुनिल कामतेकर,
**वय** – २३ वर्षे, **व्यवसाय** – सुतारकाम,
**पत्ता**– मारळ, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

**आरोपी क्र.४ चे नांव** – रमेश तुकाराम घाग,
**वय** – ५९ वर्षे, **व्यवसाय** – शेती,
**पत्ता**– बामणोली, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

**यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवणेत येतो की,**

तुम्ही आरोपी क्र.१ ते ४ यांनी आपसांत संगनमताने दिनांक ०९/०३/२०२२ रोजी शिकारीची बंदूक घेवून विनापरवाना मौजे गोठणे नियतक्षेत्र कक्ष–क ३८, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी मधील चांदोली राष्ट्रीय उद्यानामध्ये रात्री १२:०० च्या सुमारास अपप्रवेश करुन शिकारीचा प्रयत्न केला. सबब, तुम्ही त्याद्वारे, **वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम**

**९ सह वाचनीय भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४ अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

दुसरे असे की, उपरोक्त वेळी, ठिकाणी, दिवशी तुम्ही आरोपी क्र.१ ते ४ यांनी आपसांत संगनमताने विनापरवाना सदर चांदोली राष्ट्रीय उद्यानात अपप्रवेश करुन वन्यजीव व वनोपज नष्ट करण्याचा प्रयत्न केला. सबब, तुम्ही त्याद्वारे, **वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम २९ सह वाचनीय भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४ अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

तिसरे असे की, उपरोक्त वेळी, ठिकाणी, दिवशी तुम्ही आरोपी क्र.१ ते ४ यांनी आपसांत संगनमताने विनापरवाना सदर चांदोली राष्ट्रीय उद्यानात शिकारीची बंदूक घेवून अपप्रवेश केला. सबब, तुम्ही त्याद्वारे, **वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ३१ सह वाचनीय भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४ अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

चौथे असे की, उपरोक्त वेळी, ठिकाणी, दिवशी तुम्ही आरोपी क्र.१ ते ४ यांनी आपसांत संगनमताने विनापरवाना सदर चांदोली राष्ट्रीय उद्यानात शिकारीची बंदूक घेवून अपप्रवेश करुन शिकार करण्याचा प्रयत्न करुन वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे तरतुदींचा भंग केला. सबब, तुम्ही त्याद्वारे, **वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ५१ सह वाचनीय भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४ अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

पाचवे असे की, उपरोक्त वेळी, ठिकाणी, दिवशी तुम्ही आरोपी क्र.१ ते ४ यांनी आपसांत संगनमताने विनापरवाना सदर चांदोली राष्ट्रीय उद्यानात शिकारीची बंदूक घेवून अपप्रवेश करुन शिकार करण्याचा प्रयत्न केला. सबब, तुम्ही त्याद्वारे, **वन्यजीव संरक्षण**

**अधिनियम १९७२ चे कलम ५२ सह वाचनीय भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४ अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

**सदर गुन्हा माझे कार्यक्षेत्रातील असून तुमच्याविरुध्द या न्यायालयात खटला चालविला जाईल.**

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.06.05 18:12:29 +0530

स्थळ – देवरुख (रोहिणी आर. कुलकर्णी)
दिनांक – ०५/०६/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख

**प्रमाणपत्र**

आरोपींना दोषारोपपत्रातील मजकूर त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.06.05 18:12:36 +0530

स्थळ – देवरुख (रोहिणी आर. कुलकर्णी)
दिनांक – ०५/०६/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order/evidence/charge in R.C.C. No.63/2024

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | K.K.Bhingarde (Jr.Clerk) |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 05/06/2026 |
| Charge signed by PO. on | :- | 05/06/2026 |
| Charge uploaded on | :- | 05/06/2026 |